द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ : एमएससीडीए/०४/ २०२० ५ नोव्हेंबर २०२०

**मा.ना. श्री.उद्धवजी ठाकरे साहेब**
मुख्यमंत्री - महाराष्ट्र राज्य
मंत्रालय
**मुंबई - ४०० ०३२**

**विषय : कोविड १९ कोरोना वरील लस सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याच्या लस टोचणी उपक्रमात सहभागी करुन घेणेबाबत**

माननीय महोदय,

महाराष्ट्र राज्यात कोविड १९ कोरोना या संसर्गजन्य रोगाची साथ अन्य राज्यापेक्षा मोठया प्रमाणात दिसून आली. केंद्र सरकार, राज्य सरकार, प्रशासन व सर्व कोरोना वॉरियर्स यांचे सोबत औषध विक्रेत्यांनी ही या काळात औषधी पुरवठा सुरळित ठेवून आपले अमुल्य योगदान दिले आहे.

कोविड १९ कोरोना या संसर्गजन्य रोगावरील लसीचे उत्पादन अंतिम टप्प्यात असून ती लवकरच सामान्य जनतेपर्यंत पोहचण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य केमिस्टस् ॲण्ड ड्रगिस्टस् असोसिएशन (एमएससीडीए) आपल्या सर्व सभासदांच्या सहकार्याने लस टोचणी उपक्रमात सहभागी होऊन राज्यातील जनतेस लवकरात लवकर लस टोचून मिळावी यासाठी सहकार्य करण्यास तयार आहे.

महाराष्ट्र शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या लस टोचणी उपक्रमात औषधी विक्रेता ग्राहकाकडून टोचणीसाठी कोणतेही मुल्य न आकारता या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिती तसेच यासाठी आवश्यक असल्यास ती याबाबतच्या मार्गदर्शन शिबिरामध्ये ही सहभागी होऊ शकेल.

आपणास आम्ही विशेष विनंती करितो की, औषधी विक्रेत्याचा रुग्णांशी येणारा संबंध व त्यामुळे होणारा परिणाम लक्षात घेता औषधी विक्रेत्यास लस टोचणी करुन घेणाऱ्यांच्या यादीत अग्रक्रम देण्यात यावा तसेच लस टोचणी उपक्रमात सहभागी ही करुन घ्यावे.

आपणाकडून याबाबत विशेष सहकार्य व कार्यवाही अपेक्षित आहे.

धन्यवाद !

आपला नम्र
**द महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**अनिल नावंदर**
**सचिव**